क्रमांक : १७०६९ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०२६

**प्रेषक :**

**सचिव-३,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्याबाबत**

**महोदय / महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे **सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ रोजीपासून** विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **सोमवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०२६ रोजी** ई-मेलद्वारे पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार **पहिल्या टप्प्यासाठी** मा.सदस्यांकडून प्रत्येकी ३१ तारांकित प्रश्न सूचना **गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

पहिल्या टप्प्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **मा.सदस्यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवरील ऑनलाईन उपस्थितीत गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल. संसदीय कार्य विभागाने दोन आठवडयांचा म्हणजेच सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ ते शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एक जादा आठवडयाचा कार्यक्रम चक्रानुक्रमात दर्शविण्यात आला आहे.**

मा.सदस्यांनी गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी पहिल्या टप्प्याकरिता सादर केलेल्या तारांकित प्रश्नांचा लेखाजोखा (तपशील) संबंधित मा.सदस्यांना बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल. **तसेच तारांकित प्रश्नांचा प्राथम्यक्रम ही बाब पूर्णत: गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे सदस्यनिहाय बॅलटची कार्यवाही पूर्ण झाल्यावर मा.सदस्यांनी प्रश्नांच्या प्राथम्यक्रमांबाबतचा तपशील त्याच दिवशी म्हणजेच गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी १.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने भरुन अद्ययावत करावा.**

कृपया याची नोंद घ्यावी, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

**(राजेश तारवी)**
सह सचिव (स.) तथा विशेष कार्य अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत माहितीसाठी :**

- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

G:\Other computers\Main PC\Main\2026 हिवाळी\चक्रानुक्रम हिवाळी अधिवेशन २०२६\(६) पत्र - पत्रक भाग दोन.doc

# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०२६/ आश्विन १३, १९४८ शके**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील**

**तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम**

**९९.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशन कालावधीकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक खालील विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्यापूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील दर्शविण्यात आलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. (पृष्ठ क्रमांक ३ ते ५)

**मा.सदस्यांकडून गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२६ रोजी स्वीकारण्यात येणाऱ्या पहिल्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट मा.सदस्यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवरील ऑनलाईन उपस्थितीत गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी १.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, पाचवा मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल.**

**सदरहू बॅलटच्या वेळी ऑनलाईन उपस्थित असलेल्या सदस्यांनंतर ऑनलाईन अनुपस्थित असलेल्या सदस्यांना क्रमाने घेऊन मा.सदस्यांच्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट पाच फेऱ्यांमध्ये (१+२+३+५+उर्वरित) एकदाच घेण्यात येईल. त्यामुळे उपस्थित व अनुपस्थित सदस्यांचे वेगवेगळे बॅलट न काढता सर्व सदस्यांची ऑनलाईन उपस्थिती ग्राह्य धरुन एकदाच पाच फेऱ्यांमध्ये बॅलट काढण्यात येईल.**

**तसेच, मा.सदस्यांकडून शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२६ रोजीपासून स्वीकारण्यात येणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील प्रश्न सूचनांपैकी तारांकित स्वीकृत होणारे प्रश्न गुरुवार, दिनांक ५ नोव्हेंबर, २०२६ रोजी होणाऱ्या बॅलटसाठी घेण्यात येणाऱ्या प्रश्नांनंतर अनुक्रमे तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत समाविष्ट करण्यात येतील.**

**विधानपरिषद तारांकित प्रश्न सूचना स्वीकारणे व त्यावरील कार्यवाही करण्यासाठी QIS या संगणकीय प्रणालीचा वापर होत असून मा.सदस्यांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील.**

### विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) वैद्यकीय शिक्षण मंत्री<br>(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(३) मृद व जलसंधारण मंत्री<br>(४) उद्योग, गुंतवणुक, सेवा व मराठी भाषा मंत्री<br>(५) महिला व बालविकास मंत्री<br>(६) ग्रामविकास मंत्री<br>(७) कामगार मंत्री<br>(८) सार्वजनिक आरोग्य मंत्री | सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६<br>सोमवार, दिनांक १४ डिसेंबर,२०२६<br>*सोमवार, दिनांक २१ डिसेंबर,२०२६ | शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ नोव्हेंबर,२०२६<br>*शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर,२०२६ |

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| दोन | (१) महसूल मंत्री<br>(२) वने मंत्री<br>(३) आदिवासी विकास मंत्री<br>(४) कृषी मंत्री<br>(५) सामाजिक न्याय मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन मंत्री<br>(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | मंगळवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२६<br>मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२६<br>*मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर,२०२६ | शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ नोव्हेंबर,२०२६<br>*शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर,२०२६ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास,अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री<br>(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री<br>(५) इलेक्ट्रॉनिक्स,माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) परिवहन मंत्री | बुधवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२६<br>बुधवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२६<br>*बुधवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२६ | शुक्रवार, दिनांक ६ नोव्हेंबर, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १३ नोव्हेंबर,२०२६<br>*शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर,२०२६ |
| चार | (१) उपमुख्यमंत्री<br>(२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(४) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री | गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२६<br>गुरुवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२६<br>*गुरुवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२६ | सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२६<br>सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०२६<br>*सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२६ |
| पाच | (१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री<br>(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री<br>(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री<br>(७) वस्त्रोद्योग मंत्री<br>(८) सहकार मंत्री | शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२६<br>शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६ | सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२६<br>मंगळवार, दिनांक १७ नोव्हेंबर,२०२६ |
| आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ ते शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एका जादा आठवडयाच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत. | | | |

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०२६

डॉ. विलास आठवले
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रति,

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
(४) संगणक कक्ष व MKCL कक्ष

३/-

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

**(१) श्री.देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस --- मुख्यमंत्री**

(१) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क व बंदरे विषयक बाबी वगळून)
(२) ऊर्जा विभाग (अपांरपारिक ऊर्जा विषयक बाबी वगळून)
(३) विधी व न्याय विभाग
(४) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिक कल्याण विषयक बाबी वगळून)
(५) माहिती व जनसंपर्क विभाग
(६) इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय

**(२) श्री.एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे --- उपमुख्यमंत्री**

(१) नगरविकास विभाग
(२) गृहनिर्माण विभाग
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

**(३) श्रीमती सुनेत्रा अजित पवार --- उपमुख्यमंत्री**

(१) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)
(२) क्रीडा विभाग
(३) अल्पसंख्याक विकास विभाग

**(४) श्री.चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे --- महसूल मंत्री**

महसूल विभाग

**(४ क) श्री. छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ ---- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

**(५) श्री.राधाकृष्ण सिंधूताई एकनाथराव विखे-पाटील --- जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**

जलसंपदा विभाग (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)

**(६) श्री.हसन सकिना मियालाल मुश्रीफ --- वैद्यकीय शिक्षण मंत्री**

वैद्यकीय शिक्षण विभाग

**(७) श्री.चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील --- उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री**

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(२) संसदीय कार्य विभाग

**(८) श्री.गिरीश गिता दत्तात्रय महाजन --- जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**

(१) जलसंपदा विभाग (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ)
(२) आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग (आपत्ती व्यवस्थापन विषयक बाबी)

**(९) श्री.गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक --- वने मंत्री**

वने विभाग

(१०) **श्री.गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील --- पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(११) **श्री.दादाजी रेश्माबाई दगडू भुसे --- शालेय शिक्षण मंत्री**
शालेय शिक्षण विभाग

(१२) **श्री.संजय प्रमीला दुलिचंद राठोड --- मृद व जलसंधारण मंत्री**
मृद व जलसंधारण विभाग (रोजगार हमी विषयक बाबी वगळून)

(१३) **श्री.मंगलप्रभात प्रेमकंवर गुमनमल लोढा --- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

(१४) **श्री.उदय स्वरुपा रविंद्र सामंत --- उद्योग, गुंतवणूक, सेवा, मराठी भाषा मंत्री**
(१) उद्योग, गुंतवणूक , सेवा व खनिकर्म विभाग (उद्योग, गुंतवणूक , सेवा विषयक बाबी)
(२) मराठी भाषा विभाग

(१५) **श्री.जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल --पणन, राजशिष्टाचार मंत्री**
(१) पणन विभाग
(२) राजशिष्टाचार विभाग

(१६) **श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे -- पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
(१) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
(२) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (पशुसंवर्धन विषयक बाबी)

(१७) **श्री.अतुल लिलावती मोरेश्वर सावे --- इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री**
(१) इतर मागास बहुजन कल्याण विभाग
(२) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (दुग्धव्यवसाय विकास विषयक बाबी)
(३) ऊर्जा विभाग (अपारंपारिक ऊर्जा विषयक बाबी)
(४) दिव्यांग कल्याण विभाग

(१८) **डॉ.अशोक जनाबाई रामाजी वुईके --- आदिवासी विकास मंत्री**
आदिवासी विकास विभाग

(१९) **श्री.शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई --- पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
(१) पर्यटन विभाग
(२) उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग (खनिकर्म विषयक बाबी)
(३) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिक कल्याण विषयक बाबी)

(२०) **ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार --- इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री**
(१) इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग
(२) सांस्कृतिक कार्य विभाग

(२१) **श्री.दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे — कृषी मंत्री**
कृषी विभाग

(२२) **कु.आदिती वरदा सुनिल तटकरे --- महिला व बालविकास मंत्री**
महिला व बालविकास विभाग

(२३) **श्री.शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले --- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(२४) **श्री.जयकुमार कमल भगवानराव गोरे --- ग्रामविकास मंत्री**
ग्रामविकास विभाग

(२५) **श्री.नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ --- अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**
(१) अन्न व औषध प्रशासन विभाग
(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (विशेष सहाय्य विषयक बाबी)

(२६) **श्री.संजय सुशीला वामन सावकारे --- वस्त्रोद्योग मंत्री**
वस्त्रोद्योग विभाग

(२७) **श्री.संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट --- सामाजिक न्याय मंत्री**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (सामाजिक न्याय विषयक बाबी)

(२८) **श्री.प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक --- परिवहन मंत्री**
परिवहन विभाग

(२९) **श्री.भरत विठाबाई मारुती गोगावले --- रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
(१) मृद व जलसंधारण विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(२) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग ( फलोत्पादन विषयक बाबी )
(३) जलसंपदा विभाग (खारभूमी विकास विषयक बाबी)

(३०) **श्री.मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील) --- मदत व पुनर्वसन मंत्री**
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग (मदत व पुनर्वसन विषयक बाबी)

(३१) **श्री.नितेश निलम नारायण राणे --- मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**
(१) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (मत्स्यव्यवसाय विषयक बाबी)
(२) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)

(३२) **श्री.आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर --- कामगार मंत्री**
कामगार विभाग

(३३) **श्री.बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील --- सहकार मंत्री**
सहकार विभाग

(३४) **श्री.प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर --- सार्वजनिक आरोग्य मंत्री**
सार्वजनिक आरोग्य विभाग

*******